# Maharashtra Board Solutions for Class 9- Marathi Kumarbharati (Part- 2): Chapter 7- दुपार




For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com, 52, Shilpa Nagar, Somalwada Nagpur - 440015
Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888, **Website:** https://www.indcareer.com

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-9-marathi-kumarbharati-part-2-chapter-7-dupar/

IndCareer

# Maharashtra Board Solutions for Class 9- Marathi Kumarbharati (Part-2): Chapter 7- दुपार

Class 9: Marathi Kumarbharati Chapter 7 solutions. Complete Class 9 Marathi Kumarbharati Chapter 7 Notes.

## Maharashtra Board Solutions for Class 9- Marathi Kumarbharati (Part- 2): Chapter 7- दुपार

Maharashtra Board 9th Marathi Kumarbharati Chapter 7, Class 9 Marathi Kumarbharati Chapter 6 solutions

**Questions and Answers**

**1.** तुलना करा:

प्रश्न **1.**

तुलना करा:

| कष्टकऱ्यांची दुपार | लेखनिकांची दुपार |
|---|---|
| (1) | |
| (2) | |
| (3) | |
| (4) | |

उत्तर:

| कष्टकऱ्यांची दुपार | लेखनिकांची दुपार |
|---|---|
| 1. कष्टकरी उन्हातान्हात काम करतात. | कार्यालयात खुर्चीत बसून काम  करतात. |
| 2. सुखदुःखाच्या गोष्टी पत्नीशी होतात. | सहकाऱ्यांशी सुखदुःखाच्या गोष्टी होतात. |
| 3. शारीरिक कष्ट अमाप. | शारीरिक कष्ट कमी. |
| 4. साधने कष्टाची असतात. | संगणकासारखे आधुनिक उपकरण. |

**2.** कोण ते लिहा**:**

प्रश्न **1.**

कोण ते लिहा**:**

(अ) दुपारला अभिमान वाटणारा मानवी घटक – [ ]

(आ) दुपारला आनंद देणारा घटक – [ ]

(इ) दुपारच्या दृष्टीने एकविसाव्या शतकातील श्रमजीवी – [ ]

(ई) सृष्टिचक्रातील महत्त्वाचे काम करणारा घटक – [ ]

(उ) मानवी जीवनक्रमातील दुपार – [ ]

(ऊ) वृद्ध व्यक्ती दररोज आपल्या आयुष्याचे सिंहावलोकन करतात तो काळ – [ ]

उत्तर**:**

(अ) शेतकरी

(आ) मधल्या सुट्टीत खेळणारी मुले.

(इ) कार्यालयांतील लेखनिक व हिशोबतपासनीस.

(ई) दुपार

(उ) तारुण्य.

(ऊ) दुपार

**3.** आकृतिबंध पूर्ण करा*:*

प्रश्न **1.**

आकृतिबंध पूर्ण करा:




उत्तर:




**4.** डौलदार गिरिशिखरे धापाच टाकू लागतात**.**

प्रश्न **1.**

डौलदार गिरिशिखरे धापाच टाकू लागतात**.**

उत्तर:

हा चेतनगुणोक्ती अलंकार आहे.

स्पष्टीकरण: खूप जलद चालल्यावर माणसाला धापा लागतात. इथे डोंगराची शिखरे धापा टाकत आहेत. म्हणजे गिरिशिखरांवर (निर्जीव वस्तूंवर) मानवी भावनांचे आरोपण केले अहे. म्हणून हा चेतनगुणोक्ती अलंकार आहे.

***5.*** खाली काही शब्दांचे गट दिले आहेत*.* त्या गटांतून वेगळ्या अर्थाचा शब्द शोधा*:*

प्रश्न **1.**

खाली काही शब्दांचे गट दिले आहेत. त्या गटांतून वेगळ्या अर्थाचा शब्द शोधा:

उदा., मित्र – दोस्त, मैत्री, सखा, सोबती

1. रस्ता – बाट, मार्ग, पादचारी, पथ
2. पर्वत – नग, गिरी, शैल, डोगर
3. ज्ञानी – मुश, सुकर, डोळस, जाणकार
4. डौल – जोम, ऐट, दिमाख, स्वाब
5. काळजी – चिंता, स्याबदारी, विवंचना, फिकीर.

उत्तर:

1. पादचारी
2. नग
3. सुकर
4. जोम
5. जबाबदारी

**6.** स्वमत

प्रश्न (अ)

‘माझी मे महिन्यातील दुपार’ याविषयी आठ ते दहा वाक्ये लिहा**.**

उत्तर:

आठवीनंतरच्या मे महिन्यापासून सक्तीने क्लास सुरू होतो. त्या बदल्यात आम्ही मित्र घरून भांडून क्रिकेटची परवानगी मिळवतो. खेळातल्या धावा आणि घामाच्या धारा यांत आमची दुपार चिंब भिजून जाते. तळमजल्यावरचे काका खिडकीत पाण्याने भरलेले छोटे पिंप व ग्लास ठेवतात. तो आमचा मोठाच आधार असतो. क्वचित केव्हातरी टीव्हीवर सिनेमा बघण्यात दुपार जाते किंवा बाबांच्या लॅपटॉपवर गेम खेळण्यात दंग होतो. पण हे किरकोळ झाले.

क्रिकेट खालोखाल मे महिन्यातला दुपारचा आनंदोत्सव म्हणजे पार्टी! पिझ्झा पार्टी, आइस्क्रीम पार्टी किंवा भेळपुरी पार्टी. कोणाचा तरी वाढदिवस असतो, कोणाला तरी काहीतरी मिळालेले असते, खेळून खेळून भूकही लागलेली असते. अशा वेळी पार्टी होतेच. मग काय, वर्गणी काढतो आणि पार्टी करतो. ही दुपारची वेळ आम्हांला खूप आवडते.

त्या वेळी आम्ही आमचे राजे असतो. त्या वेळी "पुरे झाले, आता चला घरी,' असे कोणी सांगत नाही. मला नेहमी वाटते वर्षातून दोन-तीन वेळा तरी मे महिना यायला हवा!

प्रश्न (आ)

'दुपार' या ललित लेखातील कोणता प्रसंग तुम्हांला अधिक आवडला, ते सविस्तर लिहा.

उत्तर:

'दुपार' या ललित लेखातील मला आवडलेला प्रसंग आहे तो मधल्या सुट्टीतील धमाल सांगणारा. मला खरोखर खूप आवडला तो. तो वाचताक्षणी मला शाळेतील मधल्या सुट्टीचे सगळे दिवस झर्रकन आठवले. मधल्या सुट्टीची घंटा झाल्यावर अर्धे मिनिटसुद्धा थांबायला कोणी तयार नसतो. आम्ही डबा किती भरभर खायचो. अनेकदा तोंडात घास घेऊनच मैदानावर पळायचो. सातवीपर्यंत मी शाळेत डबा नेत असे. आठवी-नववीत मात्र डबा बंद केला. शाळेच्या कँटीनमधला वडापाव आम्हां सर्व मित्रांमध्ये लोकप्रिय.

तो वडापाव हातात घेऊन कबड्डीच्या मैदानात उतरलो होतो. विशेष म्हणजे सरांनीसुद्धा हसतहसत परवानगी दिली होती. मधली सुट्टी म्हणजे हैदोस होता नुसता! या मधल्या सुट्टीत आम्ही असंख्य गोष्टी केल्या आहेत. पाठातला हा प्रसंग लेखकांनी मोजक्या शब्दांत लिहिला आहे. पण सगळी मधली सुट्टी त्या तेवढ्या शब्दांत उभी राहते. म्हणून या पाठातला हाच प्रसंग मला सर्वाधिक आवडला आहे.

*7.* अभिव्यक्ती

प्रश्न (अ)

तीनही ऋतूंतील तुम्ही अनुभवालेल्या सकाळ व संध्याकाळचे वर्णन करा.

प्रश्न (आ)

पाठात आलेल्या 'दुपारच्या विविध रूपांचे वर्णन करा.

भाषाभ्यास*:*

रसविचार

मानवी जीवनात कलेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणतीही कलाकृती पाहताना, त्याचा आस्वाद घेताना मानवी मनात भावनांचे अनेक तरंग उठतात. कलेचा आस्वाद घेण्याचे कौशल्य प्रत्येकाच्या स्वानुभव समतेवर अवलंबून असते. ही अनुभवक्षमता शालेय वयापासून वृद्पिंगत व्हावी, या दृष्टीने 'रसास्वाद' ही संकल्पना आपण समजून घेऊया. मानवाच्या अंत:करणात ज्या भावना स्थिर व शाश्वत स्वरूपाच्या असतात, त्यांना 'स्थाविभाव' असे म्हणतात. उदा., राग, दुःख, आनंद इ. कोणत्याही कलेचा आस्वाद घेताना या भावना जागृत होतात व त्यांतून रसनिपती होते.




साहित्यामध्ये गय-पदय घटकांचा आस्वाद घेताना आपण अनेक रस अनुभवतो. गदा-पदय घटकांतून चपखलपणे व्यक्त होणारा आशय, दोन ओळींमधील गर्भितार्थ, रूपकात्मक भाषा, पदय घटकांतील अलंकार, सूचकता, प्रसाद, मापुर्व हे काव्यगुण पदोपदी प्रत्ययास येतात. अर्थपूर्ण रचनांचा रसास्वाद घेण्याची कला आत्मसात शाली, की त्यामुळे मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. भाषासमूदधीसाठी 'रसास्वाद' या घटकाकडे आवर्जून लश देऊया.

मनातील वैयक्तिक दु:खाची भावना जर साहित्यातून अनुभवाला आली तर तिथे करुण रसाची निर्मिती होते. मनातल्या दु:खाचा निचरा, विरेचन होऊन (कथार्सिसच्या सिद्धांतानुसार) कारण्याच्या सहसंवेदनेचा अनुभव घेता येतो. आणि या प्रक्रियेतून काव्याचा आस्वाद घेता येतो. तसेच वैयक्तिक दाखाची भावना सार्वत्रिक होऊन तिचे उदात्तीकरण होते. अशा भावनांच्या उदात्तीकरणामुळे मी व माझा या पलिकडे जाऊन व्यक्तींच्या व समाजाच्या भावनांचा आदर कण्याची वृत्ती जोपासली गेली तर नात्यांमधील, व्यक्तीव्यक्तींमधील भावसंबंधाचे दृढीकरण होते.

कोणतीही कलाकृती अभ्यासताना त्या कलाकृतीचा आस्वाद घेता आला तरच ती आनंददायी ठरते. एखादी कलाफूती दिलगे, ती पाहणे व ती अनुभवणे हे कलाकृतीच्या आस्वादाचे टणे आहेत. केवळ डोळ्यांनी नव्हे तर कलाकृती मनाने अनुभवता आली पाहिजे. कोणत्याही कवितेचे, पाठाचे आकलन होऊन संवेदनशीलतेने कलाकृतीतील अर्थ, भाष, विचार, सौंदर्य टिपता आले पाहिजे. कवीला काय सांगायचे आहे याविषयी दोन ओळींमधील दडलेला मथितार्थ समजला तरच कवितेचे पूर्णाशाने आकलन होते व त्याच्या रसनिष्पत्तीचा आनंद घेता येतो. आपल्या पाठयपुस्तकातील प्रत्येक पात्र, प्रत्येक कविता, प्रत्येक घटकाकडे पाहण्याचा अर्थ समजून घेण्याची ही आस्वादक दृष्टी विकसित झाली, तर भाषेचा खरा आनंद प्राप्त होईल.

**Additional Important Questions and Answers**

उतारा क्र. *1*

*1.* पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा *:*

कृती *1 : (*आकलन*)*

प्रश्न **1.**

आकृतिबंध पूर्ण करा:




उत्तर:




प्रश्न **2.**

रिकाम्या जागा भरा:

1. सूर्याची धमकी – [ ]

2. सूर्याचे प्रखर तेज – [ ]

उत्तर:

1. माझ्याकडे डोळे वटारून पाहिलेस, तर डोळे जाकून टाकीन.

2. सर्व पृथ्वीला टिपवून टाकते.

कृती ***2* : (आकलन)**

प्रश्न **1.**

कोण ते लिहा:

**1.** धन्याच्या कष्टाकडे कौतुकाने पाहणारी **– [ ]**

उत्तर:

1. शेतकऱ्याची पत्नी

कृती ***3 : (***स्वमत/अभिव्यक्ती***)***

प्रश्न **1.**

तुम्हांला या उताऱ्यावरून जाणवलेली दुपारची वैशिष्ट्ये लिहा**.**

उत्तर:

सकाळचा सूर्य, दुपारचा सूर्य ही सूर्याची वेगवेगळी रूपे आहेत. या वेगवेगळ्या रूपांमुळेच सकाळ व दुपार या कालावधींना वेगवेगळी नावे मिळाली आहेत. सकाळ प्रसन्न असते. तिच्यात उल्हास ठासून भरलेला असतो; तर दुपार ही प्रखर सूर्यामुळे रौद्र रूप धारण करते. डोळे उघडून बाहेर पाहण्याची हिंमतही होणार नाही. अशी ही तप्त, रखरखीत दुपार शेतात कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याकडे मायेने व आदराने पाहते. सकाळपासून केलेल्या कष्टाचा शीण घालवण्यासाठी तो वडा-पिंपळाच्या झाडाखाली विसावतो. पत्नीने आणलेला भाकरतुकडा तो समाधानाने खातो. त्याची पत्नी त्याच्या कष्टाकडे कौतुकाने पाहते. या दृश्याने दुपारला धन्य धन्य झाल्यासारखे वाटते.

उतारा क्र***. 2***

***1.*** पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा***:***

कृती ***1 : (***आकलन***)***

प्रश्न **1.**

रिकामी जागा भरा:

कष्टकऱ्यांच्या दुपारचे वर्णन: **……………………………………..**

उत्तर:

खेडोपाडी गावे सुस्तावतात. घरकाम सांभाळणाऱ्या स्त्रिया घरकामे आटपून घटकाभरासाठी डोळे मिटून विसावतात.

प्रश्न **2.**

पक्ष्यांची विश्रांती:

1. वडाच्या झाडावरील पक्षी: ……………………………………
2. शेकडो मैलांची रपेट करणारे पक्षी: ……………………..
3. सकाळपासून दाणापाणी मिळवण्याचे काम केलेले पक्षी: ……………………………………..

4. घरांच्या आश्रयाने राहणारी कबुतरे: ……………………………………….

उत्तर:

1. वडाच्या झाडावरील पक्षी: किलबिलाट थांबवून सावलीत छानशी डुलकी घेत विश्रांती घेतात.
2. शेकडो मैलांची रपेट करणारे पक्षी: मिळेल त्या वृक्षावर थोडी विश्रांती घेतात.
3. सकाळपासून दाणापाणी मिळवण्याचे काम केलेले पक्षी: कुठे कुठे विश्रांती घेण्याच्या प्रयत्नात असतात.
4. घरांच्या आश्रयाने राहणारी कबुतरे: गुटगू थांबवून कुठे तरी छपरांच्या सांदीत थोडी सैलावतात.

**कृती 2 : (आकलन)**

**प्रश्न 1.**

आकृती पूर्ण करा:




उत्तर:




**प्रश्न 2.**

आकृती पूर्ण करा:

सर्व जनावरे दुपारवर ही जबाबदारी ढकलतात

↓

[ ]

उत्तर:

सर्व जनावरे दुपारवर ही जबाबदारी ढकलतात

↓

जगाची सगळी काळजी व उद्याची भ्रांत

प्रश्न **3.**

विधान पूर्ण करा:

**……………………..** हा दुपारचा कार्यरत राहण्यामागील हेतू असतो**.**

उत्तर:

पुन्हा ताजेतवाने होण्यासाठी सर्वांना काही क्षण विश्रांती मिळावी, हा दुपारचा कार्यरत राहण्यामागील हेतू असतो.

कृती ***3 :*** *(*स्वमत/अभिव्यक्ती*)*

प्रश्न **1.**

तुम्ही पाहिलेल्या दुपारचे वर्णन लिहा**.**

उत्तर:

आमच्याकडे दुपार तशी शांत शांतच असते. मी शाळेतून येतो. बाबा शेतावरून येतात. हातपाय धुवून जेवायला बसतात. आम्ही सगळेच जण एकत्र जेवायला बसतो. जेवल्यानंतर बऱ्याच वेळा बाबा शेतीतल्या कामांसंबंधी बोलतात. बोलता बोलता आईबाबा काही निर्णय घेतात. आई स्वयंपाकघराची आवराआवर करते. आम्हीपण कधी कधी तिला मदत करतो. बाबा अंगणातल्या बाकड्यावर पहडतात. क्षणातच झोपी जातात. आई चटई पसरून पहुडते. आमचा कुत्रा बाबांच्या बाकड्याखाली मुटकुळे करून पहुडतो. तो झोपण्यासाठी डोळे मिटतो खरा, पण प्रत्यक्षात जागाच असतो.

मधून केव्हातरी चटकन कान टवकारून पाहतो आणि पुन्हा शांत होतो. आवारातल्या आम्हा मुलांची मात्र त्या वेळी मजा होते. सगळे विश्रांती घेत असतात, म्हणून टीव्ही बंद ठेवावा लागतो. आम्ही मित्रमंडळी घराच्या मागच्या बाजूला पडवीत जमतो. कधी पत्त्यांचा खेळ, कधी गोट्यांचा खेळ रंगतो. हे सर्व अर्थातच शांतपणे. पण केव्हातरी आवाज वाढतो. मग मोठी माणसे कुठून तरी ओरडून दम देतात. मग सगळे शांत. केव्हातरी मी नववीत असल्याची आठवण कोणीतरी करून देतोच. मग थोडा वेळ पुस्तक घेऊन बसावे लागते. अशी ही मजेची दुपार असते.

उतारा क्र*. 3*

पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा *:*

कृती *1 : (*आकलन*)*

प्रश्न **1.**

माहिती लिहा:

1. हातगाडीवाल्याचे दुपारचे जीवन.

2. सायकलरिक्षावाल्याची दुपार.

3. कारखान्यातील कामगारांची दुपार.

उत्तर:

1. हातगाडीवाल्याचे दुपारचे जीवन: हातगाडीवाला म्हणजे हातगाडीवरून लोकांचे सामान वाहून नेणारा हमाल. यात अमाप कष्ट असतात. दुपारपर्यंत बऱ्यापैकी कमाई झाली. उरलेल्या अवधीत चांगली कमाई होईल का, अशी चिंता करीत तो विश्रांती घेण्याच्या बेतात असतो. तेवढ्यात त्याला वर्दी मिळते. विश्रांतीची गरज असतानाही तो आळस झटकून गाडी ओढायला सिद्ध होतो.

2. सायकलरिक्षावाल्याची दुपार: सायकलरिक्षा तळपत्या उन्हात चालवून चालवून रिक्षावाला एखादी डुलकी घेण्याच्या विचारात असतो. पण तेवढ्यात त्याला लांबची वर्दी मिळते. म्हणजे जास्त पैसे मिळणार. म्हणून दमलेल्या शरीराची पर्वा न करता तो सायकलरिक्षा दामटतो. या रिक्षावाल्याची दुपार ही अशी असते.

3. कारखान्यातील कामगारांची दुपार: कारखान्यात पहिल्या पाळीचे कामगार कामावर हजर होण्यासाठी पहाटेच उठतात. दिवसभर यंत्राशी झगडत काम करतात. त्यामुळे दुपारी विश्रांतीची गरज असते. कामावरून सुटल्यावर डोळ्यांवरील झापड दूर सारत सारत धडपडत घरी पोहोचतात. त्याच वेळी त्यांचे दुसरे सहकारी विश्रांती हवी असताना कामावर हजर होण्यासाठी येतात. हे सुद्धा पोटासाठीच धावतपळत असतात.

प्रश्न **2.**

कोण ते लिहा:

दुपारला अभिमान वाटणारा मानवी घटक **– [ ]**

उत्तर:

दुपारला अभिमान वाटणारा मानवी घटक – [कष्टकरी]

कृती *2 : (आकलन)*

प्रश्न **1.**

का ते लिहा:

1. दुपार हातगाडीवाल्याला सलाम करते.

2. दुपार सायकलरिक्षावाल्याला सलाम करते.

3. दुपारला कारखान्यातील कामगारांविषयी कौतुक वाटते.

उत्तर:

1. दुपार हातगाडीवाल्याला सलाम करते : हातगाडीवाला हा काबाडकष्ट करणारा असतो. त्याच्या कामाला काळवेळेची मर्यादा नसते. किती वजन ओढायचे यालाही मर्यादा नसते. पैसे बहुधा त्या मानाने कमीच मिळतात. त्यामुळे दुपारची विश्रांती पुरेशी झालेली नसतानाही तो कष्ट करायला सिद्ध होतो. जीवन चालू ठेवायला सिद्ध होतो. म्हणून दुपार त्याला सलाम करते.

2. दुपार सायकलरिक्षावाल्याला सलाम करते: सायकलरिक्षा जिथे आजही चालू आहे, तो परिसर प्रचंड उकाड्याचा आहे. तळपत्या उन्हात सायकलरिक्षा चालवणे हे कोणालाही थकवणारे असते. त्याला दुपारी विश्रांतीची नितांत गरज असते. तरीही वर्दी मिळताच पोटाची खळगी भरण्याकरिता तो भर दुपारी सायकल मारत निघतो. त्याची ही जीवनावरची निष्ठाच असते. म्हणून दुपार त्याला सलाम करते.

3. दुपारला कारखान्यातील कामगारांविषयी कौतुक वाटते: कारखान्यातील काम तीन पाळ्यांमध्ये चालते. सकाळीच कामावर हजर झालेला कामगार दुपारी घराकडे निघतो. त्याच्या डोळ्यांवर झोपेची झापड असते. विश्रांतीसाठी तो अधीर झालेला असतो. त्याच्यानंतर दुसरे कामगार येतात. त्यांनाही खरे तर दुपारची विश्रांती हवी असते. पण सतत कार्यरत राहण्याची त्यांची वृत्ती असते. म्हणून दुपारला त्यांचे कौतुक वाटते.

कृती *3: (स्वमत/अभिव्यक्ती)*

प्रश्न **1.**

तुम्हांला जाणवलेले कष्टकऱ्यांचे मोठेपण सांगा**.**

उत्तर:

हातगाडीवाले व सायकलरिक्षावाले हे कष्टकरी आहेत. किती ओझे वाहून न्यावे लागेल, किती अंतर जावे लागेल व त्यासाठी किती कष्ट पडतील, हे त्यांना ठाऊक नसते. पैसे बहुतेक वेळा कमीच मिळतात. तरी ते विश्रांतीची पर्वा

करीत नाहीत. पोटाची खळगी भरण्याकरिता धावत असतात. एक प्रकारे ते जीवनचक्र चालू ठेवण्यासाठीच धडपडत असतात.

हेच कारखान्यातील कामगारांबाबतही घडते. त्यांचेही काम कष्टाचेच असते. मात्र या कामगारांच्या वेळा ठरलेल्या असतात. तरीही वेळा पाळण्यासाठी स्वत:च्या आरामाचा, स्वास्थ्याचा त्याग करतात. ही त्यांची स्वत:च्या कामावरची निष्ठा असते. कष्टकऱ्यांच्या त कामगारांच्या निष्ठेमुळेच हे जीवनाचे चक्र चालू असते. माझ्या मते, समाजाने त्यांचे ऋणी राहिले पाहिजे.

उतारा क्र. ***4***

***1.*** पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा***:***

कृती ***1 : (***आकलन***)***

प्रश्न **1.**

कोष्टक पूर्ण करा:

| मुलांची कृती | दिसून येणारी भावना |
|---|---|
| 1. मधल्या सुट्टीत आरडाओरड | |
| 2. पटापट डबा खातात व हात धुतात. | |

उत्तर:

| मुलांची कृती | दिसून येणारी भावना |
|---|---|
| 1. मधल्या सुट्टीत आरडाओरड | उल्हास |
| 2. पटापट डबा खातात व हात धुतात. | खेळाची ओढ |

प्रश्न **2.**

चौकट पूर्ण करा:

मुलांच्या मधल्या सुट्टीतील करामती

1. ………………………………………………………………….
2. ………………………………………………………………….
3. ………………………………………………………………….

उत्तर:

मुलांच्या मधल्या सुट्टीतील करामती

1. आरडाओरड करीत वर्गातून धूम ठोकतात.
2. पटापट डबा खाऊन हात धुतात.
3. राहिलेल्या थोड्या वेळात खेळ व मस्ती करतात.

कृती ***2 : (***आकलन***)***

**प्रश्न 1.**

**कोण ते लिहा:**

**1.** **समोर काम येऊ नये, असे वाटते ती वेळ:**

**उत्तर:**

1. दुपार.

**प्रश्न 2.**

**का ते लिहा:**

1. शहरातल्या कार्यालयातील लेखनिकांचे व हिशोबतपासनिसांचे लक्ष भिंतीवरील घड्याळाकडे असते.
2. समोर नवीन काम येऊ नये, अशी त्यांची इच्छा असते.
3. जिवाभावाच्या गप्पा मारतात.
4. एकमेकांच्या डब्यातल्या पदार्थांची चव चाखत जेवतात.

**उत्तर:**

1. भूक लागलेली असते व डबा खायचा असतो म्हणून.

2. निवांतपणे जेवता यावे म्हणून.
3. ताजेतवाने होण्यासाठी.
4. एकमेकांविषयी जिव्हाळा वाटतो म्हणून आणि विविध चवींचा आस्वाद मिळावा म्हणून.

उतारा क्र. ***4***

पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा*:*

कृती ***1 :*** (आकलन***)***

प्रश्न **1.**

आकृतिबंध पूर्ण करा:




उत्तर:




कृती *2 : (*आकलन*)*

प्रश्न **1.**

आकृती पूर्ण करा:




उत्तर:




प्रश्न **2.**

गाळलेल्या जागा भरा:

वृद्‌ध माणसांचे चिंतन:

**1. ………………………..**

**2. ……………………….**

उत्तर:

1. आतापर्यंतच्या आयुष्यात काय कमावले, काय गमावले, याचा विचार करतात.

2. स्वत:च्या भविष्याची चिंता करीत बसतात.

कृती ***3 : (स्वमत/अभिव्यक्ती)***

प्रश्न **1.**

तुम्हाला जाणवलेले संसाराचे चक्र स्पष्ट करा**.**

उत्तर:

निसर्गात ऋतूंचे चक्र असते, पाण्याचे चक्र असते. प्राणवायू, कार्बन डायऑक्साइड वायू यांची चक्रे असतात. तसेच मानवी जीवनाचेही चक्र दिसून येते. बालपण व विदयार्थिदशा ही पहिली अवस्था आहे. तारुण्याची दुसरी अवस्था आणि वृद्‌धत्वाची तिसरी अवस्था असते. या अवस्था एकेका पिढीनुसार बदलत राहतात. आता बाल्यावस्थेत असलेली मुले पुढच्या पिढीत तरुण बनतात. त्याच व्यक्ती नंतरच्या पिढीत वृद्‌ध होतात. यांतील मधली पिढी ही तारुण्याची होय. या पिढीतील माणसे कर्ती-धर्ती असतात.

त्यांच्या कर्तबगारीवरच कुटुंबाचा व समाजाचाही गाडा चालू असतो. या टप्प्यात माणसे कामात गुंतलेली असतात, अपार कष्ट करतात. म्हणून संसाराचे रूप बदलते. दुपार हीसुद्धा दिवसाची मधली म्हणजे तारुण्यावस्था असते. म्हणूनच समाजाच्या विकासाची, पालनपोषणाची सर्व कार्ये या अवधीतच चालू असतात. दुपार ही तारुण्याचे प्रतीकच आहे.

उतारा क्र. *6*

पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा*:*

कृती ***1 : (***आकलन***)***

प्रश्न **1.**

कोण ते लिहा:

1. तेजाने न्हाऊन निघणारी – [ ]

2. दुपारच्या रौद्र रूपाने अचंबित होणारी – [ ]

उत्तर:

1. बर्फाच्छादित गिरिशिखरे

2. बर्फाच्छादित गिरिशिखरे

प्रश्न **2.**

उत्तर लिहा:

अचंबित करणारे दुपारचे कार्य **– ………………………..**

उत्तर:

समुद्राच्या पाण्याची वाफ करणे आणि डोंगरावरच्या बर्फाचे पाणी करणे, हे दुपारचे अचंबित करणारे कार्य आहे.

कृती ***2 : (***आकलन***)***

प्रश्न **1.**

पाण्याचे चक्र काढा**.**

उत्तर:




प्रश्न **2.**

दुपारचे मोठेपण सांगणारे उताऱ्यातील शब्द लिहा**.**

उत्तर**:**

दुपारचे मोठेपण सांगणारे लेखकांचे शब्द : कर्तृत्ववान, कामाची प्रेरणा देणारी, सृष्टीला कार्यरत करणारी, कर्तृत्वाच्या तेजाने तळपवून टाकणारी, हितकर्ती, रक्षणकर्ती, हवेतले कीटक व जंतू यांचा नाश करणारी, उदास नसून उल्हास आहे. अचेतन नसून सचेतन आहे. दीर्घकर्तृत्ववाहिनी, कार्यरत ठेवणारी, वैभवाची वाट दाखवणारी.

कृती *3 : (*स्वमत/अभिव्यक्ती*)*

प्रश्न **1.**

लेखकांनी दुपारला उद्देशून केलेल्या दुपारच्या स्तुतीबद्दल तुमचे मत लिहा**.**

उत्तर**:**

लेखकांनी दुपारला उद्देशून लिहिलेला मजकूर म्हणजे दुपारचे स्तोत्रच आहे. ते अत्यंत योग्य आहे. एरवी लोकांच्या मनात दुपार म्हणजे कंटाळवाणा, त्रासदायक, नकोसा काळ असतो. पण लेखकांनी दुपारचे खरे रूपच आपल्यासमोर ठेवले आहे. त्यामुळे दुपारबद्दलचे आपले मत बदलण्यास मदत होते. दुपारचा लखलखीत सूर्य म्हणजे दुपारचे तेज होय. या काळात माणसाच्या हिताची सर्व कार्ये चालू असतात. कंटाळा आला, थकवा आला, तरी लोक ही कार्ये चालू ठेवतात.

त्यामुळे मानवी समाजाची भरभराट होते. म्हणूनच लेखकांनी दुपारला मानवाची हितकर्ती, दीर्घ कर्तृत्ववाहिनी, कार्यप्रवण करणारी, वैभवाची वाट दाखवणारी असे म्हटले आहे. या काळातच कर्तबगारीला बहर येतो. म्हणून दुपार ही अचेतन नसून चेतना आहे, हे लेखकांचे विधान यथोचित आहे. एकंदरीत लेखकांनी दुपारला उद्देशून म्हटलेले सर्व काही मला पूर्णपणे पटते.

भाषाभ्यास*:*

*(*अ*)* व्याकरण घटकांवर आधारित कृती*:*

***1.*** अलंकार*:*

प्रश्न **1.**

पुढील ओळींतील अलंकार ओळखा व स्पष्टीकरण लिहा:

***2.*** समास*:*

प्रश्न **1.**

सामासिक शब्दांवरून समास ओळखा:

1. चौकोन →
2. भारतमाता →
3. बापलेक →
4. धावपळ →
5. खरेखोटे

उत्तर:

1. विगू समास
2. कर्मधारय समास
3. इसमेतर वंद्व समास
4. समाहार वंद्व समास
5. वैकल्पिक वंदन समास.

***3.*** शब्दसिद्धी*:*

प्रश्न **1.**

'आळू' प्रत्यय असलेले चार शब्द लिहा.

उत्तर:

1. दयाळू
2. ममताळू
3. कृपाळू
4. मायाळू.

***4.*** वाक्प्रचार***:***

प्रश्न **1.**

पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा:

1. कृतकृत्य होणे

2. ताव मारणे

3. धूम ठोकणे.

उत्तर:

1. कृतकृत्य होणे – अर्थ : धन्य होणे.

वाक्य: वंदा पास छान पडल्यामुळे शेतकरी कृतकृत्य झाले.

2. ताव मारणे – अर्थ : भरपूर जेवणे.

वाक्य: लग्नातील जेवणात जिलेबीवर बापूने ताव मारला.

3. धूम ठोकणे – अर्थ : पळून जाणे.

वाक्य: बापाची चाहूल लागताच हरणांनी धूम ठोकली.

***(आ)*** भाषिक घटकांवर आधारित कृती***:***

***1.*** शब्दसंपत्ती***:***

प्रश्न **1.**

प्रत्येकी दोन समानार्थी शब्द लिहा:

1. धरती
2. पाणी
3. समुद्र
4. पक्षी.

उत्तर:

1. धरती = (1) धरणी (2) भूमी
2. पाणी = (1) जल (2) नीर
3. समुद्र = (1) सागर (2) रत्नाकर
4. पक्षी = (1) खग (2) विहग.

**प्रश्न 2.**

विरुद्धार्थी शब्द लिहा:

1. आनंद
2. दिवस
3. काळोख
4. पुष्कळ.

उत्तर:

1. आनंद × दुःख
2. दिवस × रात्र
3. काळोख × उजेड
4. पुष्कळ × कमी.

**प्रश्न 3.**

वचन बदला:

1. चिमणी
2. सागर
3. पक्षी
4. खेडी.

उत्तर:

1. चिमणी – चिमण्या
2. सागर – सागर
3. पक्षी – पक्षी
4. खेडी – खेडे.

***2. लेखननियम:***

**प्रश्न 1.**

अचूक शब्द ओळखा:

1. आशिर्वाद, आर्शीवाद, आर्शिवाद, आशीर्वाद.
2. अवाढव्य, अवढव्य, अवाडव्य, अव्हाढव्य.
3. विवचंना, वीवंचना, विवंचना, विहिवंचना.
4. गिरीशिखरे, गिरिशिखरे, गीरिशीखरे, गीरीशीखरे.
5. भूमीका, भूमिका, भुमिका, भुमीका.
6. प्रतीनीधी, प्रतिनीधी, प्रतिनिधि, प्रतिनिधी.

उत्तर:

1. आशीर्वाद
2. अवाढव्य
3. विवंचना
4. गिरिशिखरे
5. भूमिका
6. प्रतिनिधी.

***3.*** विरामचिन्हे***:***

प्रश्न **1.**

पुढील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा:

1. सूर्याच्या तेजाने तळपत असते पृथ्वी आणि पृथ्वीवरील माणसे प्राणी पशू पक्षी झाडे वेली

2. दुपार म्हणते उठा आराम बास

उत्तर:

1. सूर्याच्या तेजाने तळपत असते पृथ्वी आणि पृथ्वीवरील माणसे, प्राणी, पशू, पक्षी, झाडे, वेली.

2. दुपार म्हणते, 'उठा-आराम बास.'

***4.*** पारिभाषिक शब्द***:***

प्रश्न **1.**

मराठी प्रतिशब्द लिहा:

1. Calligraphy
2. Secretary
3. Action

4. Comedy

उत्तर:

1. सुलेखन
2. सचिव
3. कार्यवाही
4. सुखात्मिका.

पाठाचा परिचय:

राजीव बर्वे हे प्रसिद्ध लेखक आहेत. तसेच, त्यांनी अनेक चित्रपटांची निर्मिती केली आहे. त्यामुळे लेखन, दिग्दर्शन या क्षेत्रांचाही त्यांना चांगलाच परिचय आहे. लोकांना साधारणपणे सकाळचा व संध्याकाळचा अवधी खूप आवडतो. त्यांची वर्णनेही खूप केली जातात. सकाळ-संध्याकाळवर कविताही लिहिल्या जातात. कथा-कादंबऱ्यांमध्ये, सिनेमांमध्ये सकाळ-संध्याकाळची वर्णने, प्रसंग खूप येतात. मात्र दुपारबद्दल अशी वर्णने जवळजवळ नसतात.

दुपार म्हणजे रखरखीत, तप्त जाळ असलेली, कंटाळवाणी, नकोशी वाटणारी अशी सर्वांची भावना असते. प्रस्तुत पाठात मात्र लेखकांनी दुपारबद्दल अत्यंत आत्मीयतेने लिहिले आहे. जगण्याची धडपड, नवीन जीवन घडवण्याची प्रेरणा व नवनिर्मितीची ऊर्मी दुपारमध्येच दिसते. जीवनाचे चक्र चालू ठेवण्याचे कार्य दुपार पार पाडते. दुपारच्या रूपांकडे लेखक प्रेमाने पाहतात. म्हणून या पाठात दुपारचे लोभस वर्णन आले आहे. शहरात, गावात, जंगलात दुपार कशी वेगवेगळ्या | रूपांत अवतरते, त्यांचे सुंदर वर्णन या पाठात आहे.

शब्दार्थ:

1. उल्हास – आनंदाने भरलेला उत्साह.
2. मध्यान्ह – दुपारची वेळ, दिवसाचा मध्य.
3. रौद्र – प्रचंड क्रोध, संताप यांनी भरलेले अत्यंत भयंकर व भीतिदायक असे रूप.
4. शिणवटा – थकवा.
5. घरची लक्ष्मी – पत्नी.
6. कृतकृत्य – धन्य.
7. रपेट – फेरफटका.
8. सांदीत – खाचेत, दोन बाजूंमधील अत्यंत चिंचोळ्या जागेत.
9. सैलावलेली – सुस्तावलेली.
10. घासाघीस – जास्तीत जास्त नफा मिळवू पाहणारा विक्रेता व कमीत कमी किमतीत वस्तू मिळवू पाहणारा ग्राहक यांच्यात
11. किमतीवरून होणारी खेचाखेच.
12. कार्यरत – कामात मग्न, कामात गुंतलेला.
13. अव्याहत – सतत, न थांबता.
14. अथांग – ज्याचा थांग (पत्ता) लागत नाही असा.
15. मैलोगणती – कित्येक मैल.
16. काहिलीने – प्रचंड उष्ण्याने.

17. अचंबित – आश्चर्यचकित.

**टीप:**

**मध्यान्ह:**

मध्य+अन्ह, अहन् म्हणजे दिवस, 'अन्ह:' हे अहन्चे षष्ठीचे रूप, म्हणून अन्हः=दिवसाचा. 'अन्हः' हा शब्द मराठीत येताना त्यातील विसर्ग लोप पावला आहे. यावरून मध्यान्ह दिवसाचा मध्य.

वाक्प्रचार व त्यांचे अर्थ:

1. घाम गाळणे – खूप कष्ट करणे.
2. कृतकृत्य होणे – धन्य होणे, धन्य धन्य वाटणे.
3. चार पैसे गाठीला बांधणे – पैशांची बचत करणे.
4. बेगमी करणे – भविष्यासाठी तरतूद करणे.
5. भ्रांत असणे – विवंचना असणे.
6. ताव मारणे – भरपूर खाणे, पोटभर खाणे.
7. धूम ठोकणे – पळून जाणे.

# Maharashtra Board Solutions Class 9 Marathi Kumarbharati


**Part- 1**

- Chapter 1- वंद्य 'वन्दे मातरम्'
- Chapter 2- संतवाणी (अ) जैसा वृक्ष नेणे- संत नामदेव
- Chapter 2.2- संतवाणी (आ) धरिला पंढरीचा चोर-संत जनाबाई
- Chapter 3- कीर्ती कठीयाचा दृष्टान्त
- Chapter 4- नात्यांची घट्ट वीण
- Chapter 5- एक होती समई
- Chapter 5.1- हास्यचित्रांतली मुलं

**Part- 2**

- Chapter 6- या झोपडीत माझ्या
- Chapter 7- दुपार
- Chapter 8- अभियंत्यांचे दैवत-डॉ. विश्वेश्वरय्या
- Chapter 9- मी वाचवतोय
- Chapter 10- यंत्रांनी केलं बंड
- Chapter 10.1- इंग्लंडचा हिवाळा

**Part- 3**

- Chapter 11- मातीची सावली
- Chapter 12- महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया
- Chapter 13- थोडं 'आ' भारनियमन करूया
- Chapter 14- आदर्शवादी मुळगावकर
- Chapter 15- निरोप
- Chapter 15.1- 'बिग 5' च्या सहवासात

**Part- 4**

- Chapter 16- वनवासी
- Chapter 17- ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ
- Chapter 18- हसरे दुःख
- Chapter 19- प्रीतम
- Chapter 20- आपुले जगणे...आपुली ओळख!
- Chapter 20.1- विश्वकोश

# About About Maharashtra State Board (MSBSHSE)

The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or MSBSHSE (Marathi: महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ), is an **autonomous and statutory body established in 1965**. The board was amended in the year 1977 under the provisions of the Maharashtra Act No. 41 of 1965.

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education (MSBSHSE), Pune is an independent body of the Maharashtra Government. There are more than 1.4 million students that appear in the examination every year. The Maha State Board conducts the board examination twice a year. This board conducts the examination for SSC and HSC.

The Maharashtra government established the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, also commonly referred to as Ebalbharati, in 1967 to take up the responsibility of providing quality textbooks to students from all classes studying under the Maharashtra State Board. MSBHSE prepares and updates the curriculum to provide holistic development for students. It is designed to tackle the difficulty in understanding the concepts with simple language with simple illustrations. Every year around 10 lakh students are enrolled in schools that are affiliated with the Maharashtra State Board.

# FAQs

Where do I get the Maharashtra State Board Books PDF For free download?

You can download the Maharashtra State Board Books from the eBalbharti official website, i.e. cart.ebalbharati.in or from this article.

Add image

How to Download Maharashtra State Board Books?

Students can get the Maharashtra Books for primary, secondary, and senior secondary classes from here. You can view or download the Maharashtra State Board Books from this page or from the official website for free of cost. Students can follow the detailed steps below to visit the official website and download the e-books for all subjects or a specific subject in different mediums.

Step 1: Visit the official website *ebalbharati.in*

Step 2: On the top of the screen, select "Download PDF textbooks"

Step 3: From the "Classes" section, select your class.

Step 4: From "Medium", select the medium suitable to you.

Step 5: All Maharashtra board books for class 11th will now be displayed on the right side.

Step 6: Click on the "Download" option to download the PDF book.

Who developed the Maharashtra State board books?

As of now, the MSCERT and Balbharti are responsible for the syllabus and textbooks of Classes 1 to 8, while Classes 9 and 10 are under the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE).

How many state boards are there in Maharashtra?

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, conducts the HSC and SSC Examinations in the state of Maharashtra through its nine Divisional Boards located at Pune, Mumbai, Aurangabad, Nasik, Kolhapur, Amravati, Latur, Nagpur and Ratnagiri.

# About IndCareer

IndCareer.com is a leading developer of online career guidance resources for the Indian marketplace. Established in 2007, IndCareer.com is currently used by over thousands of institutions across India, including schools, employment agencies, libraries, colleges and universities.

IndCareer.com is designed to assist you in making the right career decision - a decision that meets your unique interests and personality.

For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com

52, Shilpa Nagar,

Somalwada

Nagpur - 440015

Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888

**Website:** https://www.indcareer.com